# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

क्र.एमपीआर/6753 दि. 03.06.2024

**- सूचनापत्र -**

क्र. एमपीआर/3130 दि.11.08.2023 अन्वयेच्या जाहिरातीव्दारे, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)' या संवर्गातील 226 रिक्त पदे भरण्याकरीता दि. 22.12.2023 रोजी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा घेऊन, दि. 13.03.2024 रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या निवडयादीमधील, मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या पडताळणी सापेक्ष निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/Forprospects/Recruitment/Chief Personnel Officer यासंकेतस्थळावर दि. **11.06.2024 या** कालावधीमध्ये उपस्थित राहण्याचे ई-मेलव्दारे, नोंदणीकृत टपालाव्दारे तसेच सूचना पत्र प्रसारित करुन निर्देश देण्यात आले आहेत.

तथापि, सदर दिवशी खालील तक्ता-अ येथे नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांनी त्यांच्या **सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या पडताळणीकरीता खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेस व दिनांकादिवशी उपस्थित रहावे. पडताळणीकरीता अनुपस्थित राहणा-या उमेदवारांचे नाव निवडयादीमधून कमी करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

तक्ता – अ

| अ.क्र. | उपस्थित रहावयाचे उमेदवार | उपस्थित रहावयाची वेळ व दिनांक | उपस्थितीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | सोबत जोडलेल्या यादीनुसार, | दि. 11.06.2024 रोजी सकाळी 11.00 ते 1.30 वाजेपर्यंत<br>व<br>दि. 11.06.2024 रोजी दुपार 2.30 ते 5.00 वाजेपर्यंत | समिती सभागृह क्र. 1, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, जूनी इमारत, दुसरा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई – 400 001. |

**कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणा-या उमेदवारांकरीता आवश्यक सूचना :**

1. सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्जामध्ये माहिती भरुन, सदर अर्ज सोबत आणणे आवश्यक आहे.
2. शालांत परीक्षा गुणपत्रक व शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. शालांत परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. सर्व सेमीस्टरच्या गुणपत्रिकांसह, पदवी परीक्षा गुणपत्रक व पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. मान्यताप्राप्त विद्यापिठाचे/महाविद्यालयाचे प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण प्रमाणपत्र तसेच टक्केवारी नमुद करणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
6. मराठी व इंग्रजी टंकलेखनाची विहित गतीची परीक्षा उत्तीर्ण असल्याचे शासनाचे व्यावसायिक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
7. मराठी व इंग्रजी लघुलेखनाची विहित गतीची परीक्षा उत्तीर्ण असल्याचे शासनाचे व्यावसायिक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
8. 'एम.एस.सी.आय.टी'परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस/2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
10. जन्मदिनांक समाविष्ट असलेले शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मदाखला सादर करणे आवश्यक आहे.
11. 'कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)' या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता प्रसारित केलेल्या क्र. एमपीआर/3130 दि.11.08.2023 अन्वयेच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्हतेनुसार, उमेदवाराने धारण केलेल्या सर्व शैक्षणिक आणि इतर आवश्यक प्रमाणपत्रे तसेच सामाजिक आरक्षणांतर्गत आवश्यक असलेली **सर्व मूळ प्रमाणपत्रे** पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहेत.

12. समांतर आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शासन निर्देशानुसार आवश्यक ती **सर्व मूळ प्रमाणपत्रे** सादर करणे आवश्यक आहे.

(महिला आरक्षण/माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/खेळाडू/अंशकालीन पदवीधर/ अनाथ/दिव्यांग)

13. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील उमेदवारांनी ते/त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे सन 2023-24 या आर्थिक वर्षामध्ये वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

14. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे.

15. दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे सक्षम शासकीय प्राधिका-यांनी दिलेले ऑनलाईन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16. **वर नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे / इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह, साक्षांकीत प्रतींचा एक संच पडताळणी करीता सादर करणे आवश्यक आहेत.**

17. लेखनिकाची सुविधा घेतलेल्या दिव्यांग कर्मचा-यांनी लेखनिकाची शैक्षणिक पात्रता ही कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)पदाच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.

18. सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास, नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र (प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी राजीनामा देणे आवश्यक राहील) सादर करणे आवश्यक आहे.

19. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून इतर सर्व जिल्हयातील उमेदवारांनी पोलिस ना - हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता आवश्यक असलेला संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयाचा पत्ता सोबत आणणे आवश्यक आहे.

20. उपरोक्त बाबत काही शंका असल्यास दूरध्वनी क्र. 022-22620251 विस्तारीत क्र. 4610, 4626 वर संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| सही/- दि.03.06.2024 | सही/- दि.03.06.2024 | सही/- दि.03.06.2024 |
| (रुपाली बेर्डे) | (चित्रा सावंत) | (रिमा ढेकणे) |
| प्रशासकीय अधिकारी(एमपीआर) | सह प्रमुख कर्मचारी अधिकारी(आस्थापना) | प्रमुख कर्मचारी अधिकारी |